‘शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या सामाजिक, आर्थिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ – ‘मराठवाडा’

डॉ. देशमुख प्रकर्ष सुभाषराव
समाजशास्त्र विभाग प्रमुख

प्रा. मनोजकुमार रामदासराव पवार
समाजशास्त्र विभाग प्रमुख

१) प्रस्तावना :-

भारतीय समाजात स्त्रीचा दर्जा कसा होता व काळाच्या ओघात या दर्जात कसकसे बदल झालेले आहेत हा विषय समाजशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ, समाजसुधारकाकरीता एक महत्वाचा व तसा अनिर्णीत विषय आहे. परंतु या संदर्भात विचारवंतात दोन वेगवेगळ्या प्रकारची मते आढळून येतात. जुन्या परंपरा आणि रुढी व परंपरागत हिंदू संस्कृतीचे अभिमान बाळगणारे तसेच अगदी वैदिक काळापासून हिंदू संस्कृतीने स्त्रीयांना पुरुषाबरोबरीचे स्थान दिल्याचे आग्रहाने मांडतात तर काही लोक, विचारवंत आपल्या समाजातील बहुपत्नी, केशवपनाची प्रथा, सती प्रथा, विधवा विवाहास बंदी, स्त्रीचा कुटुंबातील मर्यादित अधिकार, तिचे कार्यक्षेत्र व शिक्षणाचा अभाव याच आधारावर स्त्रीयांची स्थिती दयनीय असल्याचे प्रतिपादन करतात. या दोन्ही दृष्टीकोनाचे पुरस्कर्ते आपआपल्या मताच्या पुष्टीकरीता सोयीस्कर पुरावे देखील मांडतात. पण समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून असा एकांगी विचार करुन चालणार नाही. स्त्रीचा सामाजिक दर्जाचा विचार करताना प्रत्यक्ष व्यवहारात स्त्री कोणता दर्जा उपयोगीत होती व तात्विक पातळीवर तिला कोणता दर्जा प्रदान केला गेला होता याचा विचार करावा लागेल. तर काही उच्चवर्णीय स्त्रीयांना एका काळात शिक्षणाची संधी होती. याच आधारावर स्त्री शिक्षणाच्या बाबतीत समाजात स्त्री-पुरुष भेद नव्हता असे म्हणणे न्याय्य होणार नाही. कारण स्त्रीयांचा शिक्षित वर्ग संपूर्ण भारतीय स्त्री वर्गाचे प्रतिनिधित्व करीत नाही.

स्त्रीच्या सामाजिक दर्जाच्या मुल्यमापनात एक दुसरी महत्वाची बाब म्हणजे या दर्जाच्या संबंधातील श्रेष्ठ-कनिष्ठतेचा विचार समाजशास्त्रात दर्जा (status) हा शब्द पद किंवा स्थानाचा

निदर्शक आहे. त्यात तसा श्रेष्ठ, कनिष्ठतेचा विचार नाही पण तिच्या सामाजिक दर्जाचा विचार करताना आपण काही निकषाच्या आधारावर दिला. समाज व्यवस्थेत योग्य स्थान दिले होते की नाही याचाही विचार करता व तसे करताना वापरले जाणारे निकष प्रामुख्याने पाश्चिमात्य संस्कृतीतील किंवा आजच्या विकसित समाजातील असतात व अशा विवेचनात सांस्कृतिक स्वकेंद्रिततेचा दोष आपल्या विवेचनात आपल्या हे दोष टाळण्याचा व दर्जाच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेबाबत काही सर्वमान्य निकषांचा वापर करावयाचा आहे.

वैदिक काळापासून ते उत्तर वैदिक काळापर्यंत तसेच स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत वेगवेगळ्या कालखंडाच्या संदर्भात दर्जाचा विचार करावयाचा झाल्यास त्यात कोणकोणते परिवर्तन झालेले आहे ते आपणास पाहता येईल.

अनेक पाश्चिमात्य विद्वानांचे मत असे आहे की, काही जन्मजात दोषामुळे स्त्री व पुरुष समान मानता येणार नाहीत. डॉ. रुबेक यांचे असे मत आहे की, ‘अस्मिता हा स्त्रीचा स्वाभीमान आहे.’ तर प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्राईड म्हणतो की, ‘स्त्री’ ही मुलतः ईर्ष्या, असुयेने पीडित असल्यामुळे तिच्याजवळ न्यायबुध्दी कमी आहे. परंतु सुदैवाने भारतीय तत्ववेत्यात स्त्रीच्या संबंधात अशी कुठलीही भ्रांत धारणा नाही.’ अगदी वैदिक काळापासून स्त्रीला शक्तीचे प्रतीक मानले आहे. आपल्या समाजात स्त्रीची लक्ष्मी, दुर्गा, सरस्वती या रुपात आराधना केली जाते. स्त्रीच्या अभावी पुरुष अपूर्ण मानला जातो. तिला अर्धांगिनी म्हणून बरोबरीचा दर्जा दिलेला दिसतो. वैदिक व उत्तर वैदिक काळात स्त्रीचा सामाजिक दर्जा चांगला होता कालांतराने तिचे अनेक अधिकार हिरावून घेतले गेले व मध्ययुगात तिची अवस्था दयनीय झाली. समाजाने तिच्यावर अनेक बंधने, अयोग्यता लादल्यामुळे सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

वैदिक काळात भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीयांचे स्थान उच्च दर्जाचे होते. मैत्रेयी, गार्गी यासारख्या विदुषी त्या काळात होऊन गेल्या. परंतु मध्ययुगापासून स्त्रीयांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादण्यात आली. स्त्रीयांना बंदीस्त जीवन जगण्यास भाग पाडण्यात आले यानंतरच्या शतकात पाश्चात्य देशासह भारतातसुध्दा अनेक स्त्रीमुक्ती चळवळी घडून आल्या. स्त्री-पुरुष संबंधामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीयांवरील अन्यायाचे जोखड फोडून काढण्यासाठी

आणि त्यांना समाजात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करुन देण्यासाठी स्त्रीवादी क्रांतीकारी विचारसरणी पुढे उदयाला आलेली आहे.

भारतीय समाजातील समाजसुधारकानी मोलाचे योगदान दिले आहेत. त्यात राजाराम मोहनरॉय, म. फुले. ईश्वरचंद विद्यासागर, महर्षि धोंडो केशव कर्वे, न्या. रानडे, राजर्षी शाहू महाराज इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातील

सतीची चाल, पडदा पध्दती, बालविवाह, विधवा पुर्नविवाह संमती वयाचा कायदा इ. बाबत समाज जागृती तसेच कायद्याद्वारे परिवर्तन घडवून आणण्यात यश आले आहे. याबरोबरच सावित्रीबाई फुले यांनीसुध्दा शिक्षणाची दारे खुले केले. दयानंद सरस्वती यानी आर्य समाज याची स्थापना करुन स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला. स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने अनेक प्रयत्न झालेले आहेत. १८५१ मुलीच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याच्या उद्देशाने Indian Societies ची स्थापना करण्यात आली. या शतकात स्त्री शिक्षणासाठी स्त्री प्रशिक्षण महाविद्यालये स्थापन झाली. कमी प्रमाणात का होईना स्त्रिया शिक्षक, परिचारिका, डॉक्टर इत्यादी नोकरीच्या क्षेत्रात शिरु लागल्या हे शहरातच दिसून येत होते आता ग्रामीण भागातही दिसून येऊ लागल्या आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात तिचा सामाजिक दर्जा सुधारण्याचे अनेक प्रयत्न झाले. आपल्या देशात स्त्रीयांना दर्जा सुधारण्याकरीता तेवढे प्रयत्न करावे लागले नाहीत. जेवढे पाश्चिमात्य समाजातील स्त्रीयांना जास्त प्रयत्न करावे लागले. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातसुध्दा स्त्रीला मतदानाचा अधिकार आता मिळाला व त्याकरीतादेखील त्यांना बराच संघर्ष करावा लागला. रशियातही पुरुष डॉक्टराच्या तुलनेत महिला डॉक्टराची संख्या जास्त आहे. तरी पण त्याना मानसन्मान कमीच आहे.

२० व्या शतकात स्त्रीयांनी आपला सामाजिक दर्जा व भूमिका पार पाडण्यात पुरुषांच्या बरोबरीने प्रयत्न केलेले आहेत. समाजसुधारकांनी राष्ट्रीय आंदोलनात पुरुषांच्या बरोबरीने भाग घेऊन आपल्या स्त्री शक्तीचा परिचय करुन दिलेल्या आहेत. आधुनिक महिला डॉक्टर पती पत्नीचे नाते सहकारी या तत्वावर आधारीत असते व त्यातून मानसिक समाधानाला महत्व दिले जाते. डॉक्टर महिलांबरोबर त्यांच्या पतीनाही गृहव्यवस्था, मुलाचे संगोपन, मनोरंजन, व्यवसायात पत्नीला

सहकार्य करावे लागतात. त्याचप्रमाणे आर्थिक उन्नती बरोबरच धार्मिक व सांस्कृतिक बाबीचे पालन करुन सामाजिक वर्तनाद्वारे समाजाशी एकरुप होऊन आपापली कर्तव्ये पार पाडावी लागतात. स्त्रीयाकडे वर्तमान काळात एक भांडवली घटक म्हणून पाहीले जात आहे.

आधुनिक समाजात स्त्री आणि पुरुषांची भूमिका व दर्जा बदललेला आढळून येतो. स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वाने स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन प्रत्येक क्षेत्रात कार्य करताना दिसून येतात.

औद्योगिकरण, पाश्चिमात्यीकरण, नागरीकरण, शिक्षण, नवनवीन कायदे, जागतिकीकरण, स्त्रीवाद, महिला सबलीकरण यामुळे महिलांच्या कार्यात बदल झालेले दिसून येतात. आधुनिक काळात लोकसंख्यावाढीमुळे लहान कुटुंबावर भर दिला जातो. शिवाय व्यवसाय व नौकरीच्या कक्षा वाढल्यामुळे व्यक्ती स्वतःच्या गावापासून दूर दूर जात आहे. या कारणामुळे संयुक्त कुटुंबाचे विभक्त कुटुंबामध्ये रुपांतर होताना दिसून येत आहे. यामुळेच कुटुंबातील पती-पत्नीचा दर्जा त्यांची भूमिका व कार्य परिस्थितीनुसार बदलताना आढळून येतात. स्त्रीमुक्तीच्या चळवळीमुळे स्त्री जागृत झालेली आहे. आपल्या हक्कासाठी, आत्मसन्मानासाठी ती घराबाहेर पडलेली आहे. आत्मविकास, शिक्षण आणि पुरुषांच्या बरोबरीने समाजव्यवस्थेत संधी ह्या तिच्या हक्काच्या आकांक्षा आणि मागण्या आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीमधील पुरुषाचे वर्चस्व स्त्री आता मानायला तयार नाहीत. स्त्रीयांना मिळालेल्या नव्या अस्मितेचे पडसाद कौटुंबिक आणि व्यावसायिक, धार्मिक घटकात उमटलेले दिसून येतात. महिला डॉक्टर तर वैयक्तिक सुख, समाधान, मान-सन्मान, समान हक्क मागत आहे.

विज्ञान युगात प्राचीन धर्मग्रंथाचा पगडा नाहीसा होऊन औद्योगिक क्रांतीमुळे आर्थिक उन्नतीबरोबरच व्यक्ती स्वातंत्र्याला चालना देऊन नवविचाराच्या युगास सुरुवात झालेली आहे. त्यामुळे कुटुंबाची रचना व महिला डॉक्टरांची कार्ये यात अमुलाग्र बदल झालेले दिसून येतात.

शासकीय नोकरी करणाऱ्या महिला या शहरी व ग्रामीण भागातील राहणाऱ्या आहेत. नागरी, ग्रामीण भागातील संघटित क्षेत्रात महिला डॉक्टर कार्य करतात. संघटित क्षेत्रातील स्त्रियांना निश्चित वेतन मिळते. त्यांचे कामाचे तास ठरलेले असतात. सुट्या,

भविष्यनिर्वाह निधी, मातृत्व लाभ सवलती मिळतात. त्यांची आर्थिक स्थिती निश्चित असते. त्यांना विशिष्ट शिक्षण आणि स्पर्धेतून पद प्राप्त होतात. कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविणे, अपत्याचे शिक्षणासाठी, सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी तसेच निर्माण करण्यासाठी, सुखसोयीचे जीवन या महिला डॉक्टरांचा डॉक्टरी पेशाकडे आकर्षीत होताना दिसतात. अलिकडच्या काळात स्त्री कर्मचाऱ्याच्या संख्येत झालेली वाढ भीषण महागाईमुळे आहे. वस्तू व सेवांच्या किंमती इतक्या तीव्र गतीने वाढत आहेत की, कोणत्याही कुटुंबाला केवळ एका व्यक्तीच्या उत्पादनावर योग्य रितीने कुटुंबाच्या गरजा पूर्ण करता येत नाहीत. उत्पन्नात भर घालून कौटुंबिक गरजाची योग्यरितीने पूर्ती करण्यासाठी म्हणून स्त्रीयांच्या अर्थाजनाची निकड निर्माण झालेली आहे. व त्या गरजेपोटी अनेक स्त्रीया शासकीय नोकरीत शिरलेल्या आहेत. केवळ चैन म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण नगन्य आहे. याशिवाय नोकरी वा व्यवसाय करणाऱ्या स्त्रीयांना सामाजिक प्रतिष्ठा इतराच्या तुलनेत अधिक असते या भ्रामक समजुतीने स्त्रीया नोकरी करण्यास प्रवृत्त होतात. परंतु त्यांच्या समस्येत दिवसेंदिवस भर होताना दिसून येते.

शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्रीयांना दिलेले समान हक्क ही त्याची कारणे होत. शासकीय महिला डॉक्टरांच्या सामाजिक, आर्थिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी महिला डॉक्टराच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय व्यसनाधिनता, आरोग्याची समस्या इत्यादी समस्याचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविणे, त्याचा विकास साधणे महिला डॉक्टराच्या अनेक पैलू दुर्लक्षित राहिलेले आहेत. प्रामुख्याने त्यावर लक्ष केंद्रित करुन शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करणे हा संशोधनाचा उद्देश आहे. सामाजिक दर्जाच्या अनुषंगाने वैद्यकीय विशेषीकरणाचा विचार करण्यात येणार आहे. वैद्यकीय क्षेत्रात महिला स्त्रीरोग निदान, प्रसुतीशास्त्र, मेडिसीन, दंतशास्त्र, क्षेय-किरण आदी शाखेत प्राविण्य प्राप्त करतात. त्या तुलनेत शस्त्रक्रिया शाखेत महिलांचे अल्प प्रमाण आहे.

विवाहानंतर कौटूंबिक जबाबदाऱ्या वाढल्याने आपल्या क्षेत्रात संशोधन व प्राविण्यप्राप्त करण्यास वेळ न मिळाल्यामुळेही त्यांचे डॉक्टर म्हणून असणाऱ्या कार्यास चौकट निर्माण होते व

ही चौकट शासकीय सेवेत कार्य करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या सामाजिक दर्जावर विपरित परिणाम करते.

थोडक्यात महिला डॉक्टरांच्या सामाजिक जीवन समोर ठेवून प्रस्तुत संशोधन केले जाणार आहे. शासकीय महिला डॉक्टराच्या समस्याचा अभ्यास करुन बदलत्या काळात व आधुनिक काळात डॉक्टरांना आपली एक वैशिष्ट्येपूर्ण संस्कृती कशी जपून ठेवलेली आहे. त्या दृष्टीने संदर्भीय संशोधन एक समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्वपूर्ण घडू शकते. महिला डॉक्टरांच्या सद्यस्थितीत असलेल्या सामाजिक जीवनावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अभ्यास महत्वपूर्ण आहे.

शासकीय नोकऱ्या करणाऱ्या महिला डॉक्टर म्हटल्यावर समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा एक आगळा-वेगळा पहावयास मिळतो. स्त्री डॉक्टराचे एक स्वतंत्र स्थान, दर्जा निर्माण करणं आणि त्याच बरोबर उत्पादनाचा एक घटक म्हणून त्यांच्याकडे पाहणे समाजाचा एक दृष्टीकोन असाही आहे की, त्याचा चांगला दर्जा आहे. अशा डॉक्टरांनी स्वतःचे स्थान निर्माण केलेले आहे. भारत सरकारनेसुध्दा महिला डॉक्टरांच्या सेवाची गरज दाखवून, सार्वजनिक सेवाकार्यात सहभागी करुन घेण्यासाठी जागा आरक्षित केलेल्या आहेत.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांसमोर एक कौटुंबिक समस्या निर्माण होते ती म्हणजे आपल्या कुटुंबातील मुलांना, वृध्दांना सांभाळण्यासाठी पूर्ण वेळ देऊ शकत नाही. पर्यायाने कुटुंबात पती-पत्नीत बेबनाव निर्माण होतो. नोकरी करण्याच्या कारणावरुन संघर्ष निर्माण होतो. आणि काही वेळेस याचा परिणाम म्हणून कुटुंबाचे विघटनसुध्दा झालेले दिसून येते. ही पण एक समस्या जाणवते.

नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना आपल्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्या जातात. नोकरी आणि घरकाम करताना होणारी धावपळ यातून प्रत्यक्ष शरीरावर परिणाम होतो. उदा.-उपाशीपोटी राहिल्यामुळे पायावर येणारी सुज, हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होणे इत्यादी समस्या निर्माण होतात.

थोडक्यात शासकीय नोकरी करणाऱ्या महिलांच्या दिवसेंदिवस समस्यात वाढ होत आहे. प्रचंड शारीरिक कष्ट, मानसिक त्रास, सतत होणारा कोंडमारा, निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन न घेणे, मानसिक थकवा येणे, नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे नातेवाईकाकडून आर्थिक शोषण होण, पती

व्यसनी असेल तर त्यांच्याकडून त्रास होणे. वेळप्रसंगी शारीरिक, मानसिक त्रास वाढतच राहतो. लैंगिक छळसुध्दा होतो. म्हणू त्यांच्या जीवनाचा अभ्यास करावयाचा आहे.

२) विषय निवड, समस्या सुत्रन व संकल्पना :-

शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या समस्याचा विचार करताना संशोधनाच्या दृष्टीने आलेले प्रश्न. महिला डॉक्टर सुरक्षित आहेत का? नौकरी करणाऱ्या डॉक्टर समाधानी आहेत का? अडचणी जाणून घेण्यासाठी राजकारणी लोकांच्या दबावाखाली राहतात का? कमावणाऱ्या स्त्रिया स्वावलंबी आहेत का? परावलंबी आहेत का? नौकरी करणाऱ्या स्त्रीयांना बालसंगोपनात अडचणी येतात का? कार्यालयात आर्थिक शोषण होत आहे का अधिक कष्ट करावे लागते का? वैवाहिक जीवनात समाधानी आहेत का? डॉक्टर महिलांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे? नातेवाईकांच्या अपेक्षा कोणकोणत्या? महिला डॉक्टरांचा कोणत्या विशेषीकरणाकडे कल आहे, कार्यालयात समान वागणूक मिळते का? वरिष्ठांकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळते? सबळ कोणती कारणे आहेत? महिला डॉक्टर सक्षम बनलेली आहे का? लैंगिक शोषण होत आहे का? या क्षेत्रात समान हक्क व दर्जा मिळत आहे का? तिच्या आरोग्यावर काय परिणाम होतो? प्रतिष्ठा कशी आहे?

संकल्पना

१) **नोकरशाही :-** नोकरशाही ही मराठीतील संज्ञा इंग्रजीतील Barcaulracy चे मराठीत रुपांतर होय. Barcaulracy ही संज्ञा फ्रेंच भाषेतील दोन शब्दाच्या संयोगातून अस्तीत्वात आली. Burceau या शब्दाचा अर्थ पद, अधिकार किंवा कार्यालय आहे. a cracy या शब्दाचा अर्थ प्रशासन Barcaulracy या शब्दाचा अर्थ घ्यावयाचा झाला तर अधिकाराचे पद किंवा ‘‘श्रेणीनुसार वाटप केलेली प्रशासन व्यवस्था

होय.'' अधिकार म्हणजे विशेष स्वरुपाचे हक्क आणि कर्तव्य असतात. हक्काची व कर्तव्याची जाणीव नोकरशाहीमध्ये अधिक असते.

२) **महिला डॉक्टरची भूमिका :-** ''डॉक्टर ही व्यक्ती रोग बरा करण्याच्या प्रक्रियेत तांत्रिकदृष्ट्या समर्थ, वैद्यकीय विद्याशास्त्राचे ज्ञान असणारी व प्रशिक्षित व्यावसायिक म्हणून संबोधले जाते. महिला डॉक्टराची भूमिका सामाजिक दृष्टीकोनातून पाहिले जाते. त्यांनी रुग्णाची सेवा, सल्ला घ्यावा लागतो रुग्ण व डॉक्टर यांच्या आंतरक्रियेस व आतंरसंबंधाला विशेष असे महत्व आहे.

३) **नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे स्वरुप :-** नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या दोन भाग करता येते. संघटीत व असंघटीत अशा दोन्ही क्षेत्रात नोकरी करु लागल्या आहेत. परंतु संघटीत क्षेत्रात निश्चित वेतन मिळते. त्यांचे कामाचे तास ठरलेले असतात. सुट्या, भविष्यनिर्वाह निधी, मातृत्व लाभ व सवलती मिळतात. त्यांची आर्थिक स्थिती निश्चित असते. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळते. त्यांचे विशिष्ट शिक्षण आणि स्पर्धेतून पद प्राप्त होते. म्हणूनच डॉक्टर महिला शासकीय दवाखान्यात नोकरी करताना दिसतात.

३) **संशोधन साहित्याचा आढावा :-** प्रस्तुत साहित्यात कांही साहित्याचा आढावा घेणार आहोत. प्राथमिक तथ्य संकलनाबरोबर दुय्यम तथ्य संकलनाचा वापरही करण्यात येणार आहे.

यासाठी संदर्भ ग्रंथ मराठी, हिंदी, इंग्रजी संदर्भ ग्रंथ, कथा, कादंबरी, मासिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिक, चित्रपट, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच आपल्या विषयास अनुसरुन जे काही साहित्य मिळेल त्यांचा वापर करण्यात येणार आहे. सदरील संशोधनात शासकीय दस्तऐवजाचाही समावेश करणार आहे.

या संशोधना विषयी परस्पर संबंधित असणारे साहित्य अस्ताव्यस्त असतात त्याना सुव्यवस्थित क्रम लावून, वस्तूनिष्ठ पध्दतीत, अनुभवानिष्ठीत मांडणी करीता त्याचा समावेश करुन घेणार आहोत.

४) **संशोधनाची उद्दिष्टे :-** शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या सामाजिक, आर्थिक जीवनाचा अभ्यास करताना या संदर्भात खालील व्यापक उद्दीष्टांची निवड करण्यात येत आहे.

१. शासकीय नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करणे.

२. नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

३. शासकीय नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या आर्थिक जीवनाचा आणि त्यांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

४. शासकीय नौकरी करणाऱ्या डॉक्टराच्या समाजातील सामाजिक दर्जा व भूमिकांच्या संबंधाचा अभ्यास करणे.

५. नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या आरोग्यविषयक समस्याचा शोध घेणे.

६. महिला डॉक्टरांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन कसा आहे याचा शोध घेणे.

७. नौकरी करण्यामुळे त्यांच्या वैवाहिक जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

५) **संशोधनाची गृहितके :-**

१. शासकीय नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या कौटुंबिक जीवनावर ताण येतो.

२. नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांना धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यास पूरेसा वेळ देता येत नाही.

३. शासकीय महिला डॉक्टरांच्या एकीकडे आर्थिक बाजू चांगली असूनही सामाजिक प्रतिष्ठेमुळे आर्थिक ओढाताण होते.

४. महिला डॉक्टरांचा सामाजिक दर्जा चांगला असतो परंतु तो जपताना आणि पार पाडताना ओढाताण होतो.

५. नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या नौकरी करताना वैयक्तिक आरोग्याकडे पुरेसा वेळ देता येत नाही.

६. स्त्री डॉक्डराकडे समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन आदरयुक्त असेलच असा नाही.

७. नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांचे वैवाहिक जीवन समाधानकारक असेलच असे नाही.

६) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :- सदरील संशोधन कार्यासाठी मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांतर्गत कार्यरत असलेल्या ३०० महिला डॉक्टरांचा अभ्यास करण्यात येणार आहे. सर्व जाती-धर्मातील शासकीय नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांचा समावेश राहणार आहे.

यादृच्छिक पध्दतीने प्रत्येक जिल्ह्यातील महिला डॉक्टरांच्या संख्येच्या प्रमाणात प्रमाणात प्रातिनिधिक स्वरुपात नमुना निवड करण्यात येईल.

सदरील संशोधनात एम.बी.बी.एस. (M.B.B.S.), एम.डी. एम.एस. (M.D.M.S.) सरकारी दवाख्यान्यातील डॉक्टर महिलांचा समावेश करण्यात येत आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

७) संशोधन पध्दती :- प्रस्तुत संशोधन कार्यासाठी समाजशास्त्रीय अध्ययन पध्दतीचा वापर करण्यात येईल. शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या कौटुंबिक, सांस्कृतिक, धार्मिक, आरोग्यविषयक सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी अन्वेषणात्मक/परिचयात्मक, निदानात्मक संशोधन आराखडा या पध्दतीचा वापर करण्यात येईल.

'प्रश्नावली' या प्राथमिक साधनसमुग्री तंत्राद्वारे तथ्य संकलन करण्यात येईल तसेच दुय्यम साधनसामुग्रीचाही समावेश करण्यात येईल. वर्तमानपत्रातील प्रासंगिक लेख, संदर्भग्रंथ, इंटरनेट,

शासकीय दस्तऐवज, मासिक, चित्रपट इत्यादी घटकाचाही गरजेनुसार वापर करण्यात येईल. या संशोधनातून संकलित झालेल्या तथ्याचे वर्गीकरण विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल.

८) संशोधनाचे महत्व :- शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या सामाजिक, आर्थिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास या विषयाच्या संदर्भात खालीलप्रमाणे काही मुद्याच्या आधारे महत्व मांडण्यात येतील.आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवर पाहताना :- नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांचे महत्व सबलीकरणाच्या व सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून कसे दिसून येते. तसेच महिलांच्या पूर्ण क्षमतेचा विकास करण्याकरीता योग्य आणि पोषक

वातावरण निर्माण करणे आणि महिलांना सर्व प्रकारचे मुलभूत सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक स्वातंत्र्य उपलब्ध करुन देणे तसेच मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत महिलांना समान सहभाग उपलब्ध करुन देणे. याबरोबरच आरोग्य क्षेत्रात महिलांना प्रवेशाची समान संधी उपलब्ध करुन देणे. महिलांच्या बाबतीत होणारा सामाजिक भेदभाव दूर करण्याकरीता समाजाच्या प्रवृत्तीमध्ये बदल घडवून आणणे. महिला विरुध्द होणारी सर्व प्रकारची हिंसा संपुष्टात आणणे.

इतर महत्व :

नोकरी करणाऱ्या डॉक्टर महिलाच्या कौटुंबिक जीवनातील अडचणी लक्षात येतील. महिला डॉक्टरांच्या सामाजिक संमस्याची तीव्रता कमी करण्यासाठी. महिला डॉक्टरांनी अस्वस्थाला हद्दपार करण्यासाठी. महिला डॉक्टरांच्या सुधारण घडवून आणणे. महिला डॉक्टरांच्या चांगल्या आरोग्य संपादन करण्यासाठी. महिला डॉक्टरांच्या आर्थिक जीवनाचा आढावा घेण्यासाठी. महिला डॉक्टरांच्या कल्याणासाठी. महिला डॉक्टरांच्या उपयोगासाठी. महिला डॉक्टर यांना सक्षम बनवण्यासाठी. नोकरी करणाऱ्या महिलेकडे समाजाचा दृष्टिकोण बदलण्यासाठी. वैज्ञानिक दृष्टिकोण जोपाण्यासाठी. व्यवसायिक महत्व सांगण्यासाठी. नोकरी करणाऱ्या महिलांचा उच्च दर्जा निर्माण करण्यासाठी. स्त्री-पुरुष समानतेची आकांक्षा रुजवण्यासाठी. नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या परिवर्तनासाठी.

९) प्रकरण योजना :-

१) प्रस्तावना :-

महिला डॉक्टरांचा दर्जा आणि भूमिका यांचा आढावा घेण्यात येईल. तसेच त्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. समाजातील स्त्रीयांचा दर्जा कशाप्रकारे परिवर्तन झालेले आहे आणि आपल्या दर्जामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी कोणकोणते प्रयत्न झालेले आहेत यांचा आढावा घेण्यात येईल. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, भौगोलिक आरोग्यविषयक माहितींचा आढावा घेवून स्त्रीयांची पार्श्वभूमी सांगण्यात येईल.

स्त्रीयांना हक्क व समान वागणूक कसे मिळत गेले याचा आढावा घेण्यात येईल. स्त्रीयांना जीवन जगताना कसा संघर्ष करावा लागला व समाजसुधारकांनी कशाप्रकारे समस्या सोडवण्याचा प्रयत्न केलेले आहेत. यांची थोडक्यात माहीती देण्यात येईल.

वैद्यकीय व्यवस्थेचा ऐतिहासिक आढावा : मानवी जीवना इतकाच रोगाचा व रोगावरील उपचार पध्दतीचा इतिहास जूना आहे. स्वास्थ्य-अस्वास्थ्याशी निगडित असणारे प्रश्न, मुलभूत प्रश्न आहेत. अनादी कालापासू मानवाने स्वास्थ्याच्या हेतूने अस्वास्थ्याची कारणमीमांसा करण्याचा व त्यावर उपचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातून कालानुरुप वेगवेगळ्या औषध पध्दती किंवा उपचार पध्दती अस्तीत्वात येवून विकसित झालेल्या दिसून येतात ते पुढीलप्रमाणे अ)आयुर्वेद ब) होमिओपॅथी क) यूनानी ड) ॲक्यूपंक्चर ई) ॲलोपॅथी इत्यादी पध्दती पहावयास मिळतात. त्याचा थोडक्यात इतिहास पहावयाचा आहे.

२) संशोधन पध्दती : संशोधनासाठी आवश्यक अन्वेषणात्मक परिचय संशोधन आराखड्याचे सविस्तर विवेचन करण्यात येईल. आणि यादृच्छिक नमुना निवड पध्दतीची या विषयीची माहीती विशद करण्यात येईल.

संशोधनाच्या दृष्टीकोनातून ‘प्रश्नावली’ या प्राथमिक साधन सामुग्रीची रचना व महत्व सांगण्यात येईल. तसेच संशोधनासाठी सहाय्यक ठरणाऱ्या द्वितीय साधनसामुग्रीची

माहीती देण्यात येईल जसे वर्तमानपत्रातील प्रासंगिक लेख, इंटरनेट, शासकीय दस्तऐवज इत्यादी द्वितीय साधनसामुग्रीच्या आधारे तथ्य संकलन करुन तथ्याचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल.

३) महिला डॉक्टरांचे कौटुंबिक जीवन :

शासकीय दवाखान्यात नौकरी करणाऱ्या महिला डॉक्टर यांनी कुटुंबात प्रेम, आकर्षण सहानुभूती सहकार्य व मित्रत्व या कार्याच्या आधारे महिला डॉक्टर म्हणून यांनी आपल्या जीवनाची उभारणी केलेली असते. एक सदस्य म्हणून कुटुंबात राहतात व त्याच

बरोबर नोकरीही करतात. सामाजिकरण, व्यक्तीमत्व विकास, भावनिक संवर्धन, परंपरा आणि मूल्ये यांची बीजारोपण करुन आणि एकनिष्ठतेचे संवर्धन याचा कार्यात्मक प्रभाव त्यांच्या व्यक्तीमत्वात पडतो. वरीलप्रमाणे महिला डॉक्टरांच्या कौटुंबिक स्थितीचे वर्णन करण्यात येईल.

४) महिला डॉक्टरांचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन :

आधुनिक विज्ञान युगात देखील समाज व्यवस्थेत समाजाच्या पूर्णमांडणीचे कार्य हे धार्मिक तत्वे आणि नैतिकता यावरच आधारलेले असल्याचे दिसून येते. एक कार्यात्मक व्यवस्था म्हणून धर्माची समाजातील भूमिका महत्वाची आहे. त्याच बरोबर कला, संगीत, साहित्य, नाट्य यासारख्या सांस्कृतिक घटकांशी मानवी जीवनातील निरसता कमी होण्यास मदत होते. या अनुषंगाने महिला डॉक्टर यांच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनासंबंधीचा अभ्यास या चौथ्या प्रकरणामध्ये सविस्तर अभ्यास करण्यात येईल.

तेजसिंग : संस्कृतीच्या नावाखाली पुरुषांनी स्त्रीला हक्काची दासी बनवली. डॉक्टरांच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेण्यात येईल.

५) महिला डॉक्टरांचे आर्थिक व सामाजिक जीवन :

व्यक्तीला जीवन जगण्यासाठी काही आर्थिक क्रिया व गरजा भागवण्यासाठी करावीच लागते. व्यक्तीवादी विचारात तर त्याची अत्यंत गरजच आहे. या आर्थिक क्रिया पार पाडताना आपण परंपरा, नियम व विशिष्ट पध्दतीनुसार पार पाडल्या जातात. महिला डॉक्टरांनाही आर्थिक घटकाची गरज आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या आर्थिक जीवनाचाही अभ्यास करण्यात येईल. मार्क्सवादी स्त्रीवादी विदुषक विल्यम थॉम्सन म्हणतात -

'कौटुंबिक पध्दतीत पुरुष हा भांडवलदार असून स्त्री ही कामागाराची प्रतिनिधित्व करते म्हणून आर्थिक परावलंबन हेच स्त्री स्त्री दास्याचे मुळ कारण आहे.' असे म्हणतात.

६) स्त्री डॉक्टरांचे वैवाहिक जीवन :

प्राचीन काळापासून विवाह संस्था समाजामध्ये अस्तीत्वात आहे. मानवाची लैंगिक गरज भागविण्यासाठी सुसंघटित वर्तन प्रकार अस्तीत्वात आले. ती म्हणजे विवाह संस्था जी मानवाच्या कामवासनेची पूर्ती समाजमान्य मार्गाने करते. समाजाचे अस्तीत्व व सातत्य टिकवून ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य विवाह संस्था करीत आहेत. शारीरिक स्वास्थ्य, मनशांती, संतानोत्पत्ती त्यांची पालनपोषण इत्यादी बाबीसाठी विवाह आवश्यक ठरते. परंतु विवाह संबंध संपुष्टात आला तर कौटुंबिक विघटन होते. व कौटुंबिक समस्या निर्माण होतात. महिला डॉक्टर यांच्यात घटस्फोटाचे प्रमाण कसे आहे तसेच विवाहाच्या बदलत्या स्वरुपानुसार विवाहाला कायद्यात्मक आधार मिळाला आहे. विवाह पध्दतीत बदल झालेला आहे. तसेच जोडीदार निवडीच्या पध्दतीत बदल झाला आहे. महिला डॉक्टर म्हणून जोडीदार निवडताना आपल्या बरोबरीचा असला पाहिजे मग तो कोणत्याही जाती व धर्माचा असो अशी पध्दती निर्माण झालेली आहे. महिला डॉक्टर नोकरी करीत असल्यामुळे त्यांना वैवाहिक जीवन व कुटुंबाकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. स्वावलंबी बनण्याच्या ध्येयापोटी व अपेक्षेप्रमाणे जोडीदार मिळाला नाही तर अविवाहीत राहणे पसंद करीत आहेत. त्यामुळे करारात्मक विवाहाचे प्रकार वाढत आहेत. तसेच लिव्ह इन रिलेशनशिप याना कायद्यात्मक आधार प्राप्त झाला आहे.

थोडक्यात आधुनिक काळात विवाहाकडे व्यवहारिक दृष्टीकोनातून पाहिले जाते. विवाहाला व्यावसायिक व आर्थिक आधार लाभला आहे. व्यक्ती आपल्या सोयीनुसार व गरजेनुसार विवाह विषयक नियम बनवितो तसेच आपल्या मर्जीनुसार व आवडीनुसार विवाह पध्दती व जोडीदाराची निवड करतो. त्यामुळे पारंपरिक विवाहात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झालेले आढळून येते.

७) समारोप निष्कर्ष व शिफारशी :

वरीलप्रमाणे संबंधित संशोधनाद्वारे शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या सामाजिक, आर्थिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा या संबंधीचा अभ्यास करण्यात येईल.

संशोधनाद्वारे संबंधित माहीतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल यातून प्राप्त निष्कर्षाची मांडणी करुन शिफारशी करण्यात येईल.

परिशिष्ट्ये :-

संदर्भग्रंथसूची :

१)	Pauls Anlecdates of greatings	:	Vivekanand Learners press, pvt. New Delhi, Ed. 198
२)	Phadke Y. D.		Social perform movements in Maharashtra, Maharashtra information center govt. of Maharashtra, New Delhi.
३)	Young P. V.		Scientific social survays & Research prentice hall of India, New York, 1949 pg. No. 472
४)	Elizabeth Blakwel	:	Discus in medical sociology-1902
५)	Talcot persons	:	Sociology systems Theory
६)	डॉ. सुधा काळदाते		वैद्यकीय समाजशास्त्र कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९६
७)	प्रा. कृष्णकुमार पुजारी		वैद्यकीय समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९७७
८)	रा. ना. घारोळे		समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती आठवी २००३
९)	गुरुनाथ नाडगोंडे	:	सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर
१०)	नाविबडेकर मेघा	:	महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा आणि स्त्री अभ्यासकेंद्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रथमावृत्ती २००६

११)	राम आहुजा	:	सामाजिक अनुसंधान, रावत पब्लिकेशन्स, जयपूर – २००४
१२)	डॉ. प्रकाश बोबडे		भारतीय समाजरचना पारंपरिक व आधुनिक, मंगेश प्रकाशन, नागपूत, आवृत्ती पाचवी - १९९४
१३)	डॉ. विजय सुर्यवंशी		सामाजिक संस्था आणि गट, विद्या बुक्त पब्लिकेशन्स, औरंगाबाद प्रथमावृत्ती - १९९७
१४)	James P. Warbase		Essays in medical sociology-1904
१५)	प्रा. सी. टी. कांबळे, प्रा. टी. एस. पवळे	:	भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, प्रथमावृत्ती २०१०
१६)	डॉ. सीमा साखरे	:	आमचे कायदे आमचे अधिकार, सीमा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००६
१७)	शहा घनश्याम	:	अनुवादक प्राची चिकटे, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८
१८)	खडसे भा. कि.		भारतीय समाज, हिमालय पब्लिकेशन हाऊस – १९९६
१९)	पवार उर्मिला, मीनाक्षी मून		आम्हीही इतिहास घडवला, सुगावा प्रकाशन, लातूर, २०१०
२०)	भागवत विद्युत	:	‘स्त्री प्रश्नाची वाटचाल’, संपादीत प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००५
२१)	डॉ. ऑमव्हेट गेल	:	‘जोतिराव फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार’ लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९०